चर्चा : ३

# शब्दार्थमीमांसा : काही विचार

परामर्श खंड १०, अंक ४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या "शब्दार्थ - मीमांसा" प्रा. शं. हि. केळशीकर यांच्या लेखाविषयी काही विचार मांडत आहे.

१) **सूत्र ३–४** : भाषा–तत्त्वमीमांसा ह्या विषयाची रूपरेखा विशद करताना प्रा. केळशीकर "वाणी" ही संज्ञा कधी वाचा ह्या अर्थाने तर कधी "भाषिक व्यक्तता" ह्या अर्थाने योजतात. "वाणी–वाचा–भाषा" असा तिहेरी विभेद (distinction) इंग्रजीत नाही. त्यामुळे "speech" हा एकच शब्द दोन्ही अर्थांनी वापरला जातो. आपल्या म्हणजे संस्कृत धरून भारतीय भाषांत "वाणी–वाचा" हा विभेद सहजपणे मांडला जातो. "वाणी" एक प्रकारे प्रकाश–ध्वनी ह्या सारखी मूलभूत आहे. त्यामुळे वाणी व भाषा ह्यांचे अतूट आंतरिक नाते असते. उलटपक्षी वाचा ही एक क्षमता आहे. "क्ष, ची वाचा गेली" हे म्हणताना "त्याची वाणी हरपली" असे म्हणण्याचा आपला इरादा नसतो. साक्षात उत्कट वा चिंतक अनुभव जेव्हा संज्ञतेच्या पातळीला पोचतो तेव्हा तो उत्स्फूर्तपणे शब्दांनी त्या शब्दांना त्याचा रूपाकार देत व्यक्त होतो. ह्या प्रकारच्या पूर्णरूप भाषिक आविष्काराला "वाणी" हे नाव दिले जाते. ह्याचे प्रत्यन्तर म्हणजे वाणीच्या संदर्भात "आकाशवाणी झाली", "सिंह मानवी वाणीने बोलू लागला" ह्या सारखी अकर्तरि विधाने मांडली जातात. वाणी भाषेला तिचे वळण वा रूपाकार देते ह्याचे सर्वश्रुत उदाहरण, म्हणजे निषादाला दिलेला शाप. ह्या उलट 'वाचा' ही एका बाजूने आपल्या श्रुती–उच्चार यंत्रणेशी व दुसऱ्या बाजूने आपल्या परिसरातून आपण उचललेल्या विशिष्ट भाषेशी संलग्न असते, जे ऐकू येते तेच उच्चारू

शकणारीती एक शारीरिक – मानसिक क्रिया – कृती आहे. वाचेची स्फूर्ती वाणीत असते. वाणी हे मानवी प्रज्ञेचे (Reason) लक्षण आहे. ती तिचा अंगभाव आहे.

" वाणी–वाचा–भाषा " ह्या विभेदाला समांतर असा एक तुल्य विभेद पाश्चिमात्य विचारसणीत मांडला जातो. " Logos – Thought and / or Word " ह्या विभेदातील "Thought" ह्या संज्ञेला तंतोतंत प्रतिशब्द भारतीय तत्त्वमीमांसेत नाही. " वाणी " शब्दात ह्या संपूर्ण त्रिपदीची सार्थता सामावलेली आहे. ह्या त्रिपदीत Thought ही संज्ञा वाणी प्रमाणेच सर्वस्पर्शी अर्थाने योजली जाते. ह्या संदर्भात " Thought " ह्या संज्ञेचा अर्थ " I think " ह्या मर्यादित व्यक्तिबद्ध कृतीने मांडला जात नाही. म्हणून वारंवार केलेल्या दीर्घ प्रयत्नांनंतरही अनुभववादाला " Thought " चे सूत्र सापडत नाही. ते मांडले जाते To think is to mean, to judge ह्या सर्वस्पर्शी नियमाने.

आपली व्यक्तिगत विचारप्रणाली अनुभववादी असो वा प्रज्ञावादी असो, भाषिक दृष्टीने " वाणी " व thoght ह्यांची पातळी " वाचा " व " I think " or " thinking " ह्याहून भिन्न असते. ही एक गोष्ट मान्य केली म्हणजे भाषा-तत्त्वमीमांसेतील अनेक समस्या सुकर ठरतात.

२) (अ) सूत्र१७ व ३८ : " अटी " – अर्थाला लाभणाऱ्या " अटीं " ना " समय " हा पारिभाषिक शब्द भारतीय विचारसणीत योजलेला आहे. कणाद-सूत्रांत शब्द व अर्थ ह्यांचा संबंध " सामयिक " असल्याचे स्पष्ट सांगितले आहे (वैसू ७. २. १८) " समय " हा पारिभाषिक शब्द सुटसुटीत असून तो भिन्न वळणे घेऊ शकतो. शब्दार्थ सामयिक असतो, भाषा एक संकेत–व्यवस्था असते.

Truth – Canditions – यथार्थता – समय

Conditioned response – समयबद्ध प्रतिसाद

Conditioned reflex – समयबद्ध वा उपाधिबद्ध प्रतिक्षिप्त क्रिया

ब) Casuistry – नीतिकोष्टक

३) अ) सूत्र २४ : भाषेचा " चित्र - सिद्धान्त " न म्हणता " चित्रपर-उपपत्ती " वा चित्रीय उपपत्ती म्हणणे श्रेयस्कर वाटते. " सिद्धान्त " ह्ला शब्दातच " Proved " " established " हा अर्थ मांडला जातो. विज्ञानात " सिद्धान्त " नसतात. निरनिराळ्या प्रमाणात निश्चिततेच्या (Certainty) जवळ जाऊ पाह-णाऱ्या उपपत्ती असतात.

ब) " Atomic Propositions " ना " आण्विक " न म्हणता " अणुपर विधाने " म्हणणे अधिक योग्य होईल. ह्या सन्दर्भात " atomic " हे वर्णन

परिमाणवाचक वा dimensional अर्थाने योजलेले आहे, विधानाचे विशेषण म्हणून नव्हे. " अणु " ही संज्ञाही परिमाणद्योतकच आहे.

४) सूत्र २५ व ४० : "Denotation" आणि "Reference" ह्या भिन्न संकल्पना आहेत व त्यांचा उल्लेखही भिन्न संज्ञा योजून करणे जरूरीचे आहे. " Denotation, to denote "–वस्तुनिर्देश, निर्दिष्ट वस्तू–वर्ग. वस्तू (Things) म्हणजे द्रव्यभावी वस्तू उदा : टेबल, खुर्ची–ज्यांच्या बाबतीत एक–अनेक हे लक्षण लागू पडते.

Reference – लक्षित वा उपलक्षित पदार्थ विटगेन्स्टाइनने Things व objects हा विभेद स्पष्टपणे मांडला आहे. भाषेतील सर्व संज्ञा पदार्थवाचक असतात. त्यापैकी काहीच वस्तुवाचक असतात, एक–अनेक हे द्रव्याचे लक्षण भारतीय विचारसणीत स्पष्ट सांगितले आहे. (वै. सू : १.२.११ ). बौद्ध विचारसणीतील " द्रव्य " नाकारणाऱ्या Phenomenalism ( विज्ञेयवादाला ) हे उत्तर दिले आहे. विट्गेन्स्टाइनने " Words " शब्द विचारात घेतलेले नाहीत. Names – संज्ञा व विधाने–Propositions हा विभेद त्यांनी मांडला आहे. संज्ञांना " अर्थ "–Bedeutung – meaning असतो. विधानांना " गती " – Sinn वा " Sense " असतो. संज्ञांचा अर्थ आपल्याला शिकून घ्यावा लागतो. विधाने बाणासारखी असतात. त्यांना सार्थता ( Significance) असते. म्हणून शब्दांचा वा संज्ञांचा अर्थ फक्त वाक्य–विधानात स्पष्ट होतो. (ट्रॅक्ट. ३.१४१, (३. ३), (३.३१४)) Word शब्द, Term - पद, Name संज्ञा हा तिहेरी विभेद अरिस्टॉटलच्या तर्कशास्त्रातही केला जातो. उद्देश्य – विधेयपर वा Suject – Predicate ह्या चौकटीत पदांना प्राधान्य दिले जाते, विट्गेन्स्टाइनने ही चौकट मुक्त करून वस्तुस्थिती मांडणाऱ्या विधानात सर्व प्रकारच्या संबंधी विधानांची सोय केली, जी त्यापूर्वी रसेलने मांडली होती. ह्या विचाराची सुरुवात Kant च्या Categories of the understanding व त्यांचा अवधारणा (judgments) मांडण्यासाठी आवश्यक योजना ह्या विचाराशी आहे.

५) सूत्र ५७ (४) Mental – चित्तीय Mentalistic चित्तवृत्तीय, आपल्या योगदर्शनातही चित्त, चित्तवृत्ती ह्या संज्ञा योजल्या आहेत. " चित्त " ही संज्ञा " मन " ह्या संकल्पनेहून अधिक व्यापक आहे.

वीणा गजेन्द्रगडकर

३०–३४ डॉ. डी. डी. साठे मार्ग
गिरगांव मुंबई ४००,००४.